# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १३.०४.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १२/०४/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४८,८००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १२/०४/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण २७,७७०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. १२/०४/२०२४ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ४,५४०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरुद्ध विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगाणाया विरुध दि. १२/०४/२०२४ रोजी पोस्टे कुरूंदा येथे ०२ व गोरेगाव येथे ०१ ठिकाणी अशा एकुण ०३ ठिकाणी कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.

**अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत गुटखा विक्रत्यावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अन्न सुरक्षा अधिनीयम अंतर्गत दि. १२/०४/२०२४ रोजी पोस्टे गोरेगाव येथे मौजे आजेगाव दर्गा जवळ आरोपीचे घरासमोर गावामध्ये पश्चिमेस २० किमी बिट नं ३ येथे यातील आरोपी हा स्वत:चे फायद्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळया कंपणीचा सुंगधीत गुटखा हा मानवी स्वास्थास अपायकारक विषारी घटक आहे हे माहित असतांना सुध्दा स्वत:चे फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या ताब्यात बाळगुन विक्री करण्याचे उद्देशाने मारूती सुझुकी स्विप्ट डिझायर कार क्र.एम.एच.४६ एक्स ४६५३ गाडीमध्ये साठवणुक करून विक्री करीता बाळगतांना वरील वर्णनाचा प्रतिबंधीत गुटखा व चारचाकी वाहण असा एकुण ५,३४,७२८ रू मुद्देमाल मिळुन आला म्हणुन गुन्हा.